| पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.<br>करआकारणी व करसंकलन विभाग | |
|---|---|
| परिपत्रकाचे स्वरुप | थकबाकी नसलेचा दाखला नि:शुल्क उपलब्ध करुन देणेबाबत |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/९/कावि/328 /२०२२, दिनांक 20 / १० /२०२२ |
| विषय : | **मालमत्ताकर थकबाकी नसलेचा दाखला नि:शुल्क उपलब्ध करुन देणेबाबत** |
| कोणाच्या कार्यवाहीसाठी | मालमत्ता कर आकारणी, तसेच वसूली करणारे सर्व अधिकारी / कर्मचारी |
| संदर्भ | १. कर व करेत्तर बाबींचे दरपत्रक सन २०२२-२०२३<br>२. मा. महापालिका ठराव क्रमांक ७६२ दिनांक २०/०१/२०२२<br>३. आदेश क्र.कर/मुख्य/९/कावि/ १३९ /२०२०२२,दिनांक ०८/०२/२०२२<br>४. मा. प्रशासक यांचेकडिल मा. महापालिका ठराव क्रमांक १९० दिनांक ०४/१०/२०२२ |

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत शहरातील इमारत व जमिनीवर मालमत्ता कराची आकारणी व वसूली करणेत येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' प्रकरण 08 नियम 39 नुसार मिळकतधारकास मालमत्ताकराचे बिल देणेत येते.

मालमत्ता धारकांनी त्यांचे मालमत्तेचा संपूर्ण कर भरणा केला असल्यास महानगरपालिकेचे www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावर मालमत्ता कर थकबाकी नसलेचा दाखला ऑनलाईन उपलब्ध करुन देणेची सुविधा दिली आहे. याकामी संदर्भ क्र. २ नुसार रक्कम रुपये १०/- फी आकारुन थकबाकी नसलेचा दाखला तात्काळ ऑनलाईन उपलब्ध करुन देणेत येत आहे. तथापि करदात्या नागरीकांना सुलभ सेवा मिळावी तसेच त्यांच्यामध्ये महानगरपालिकेबाबत आपुलकी व विश्वास वाढीस लागावा या दृष्टीने नागरिकांना थकबाकी नसलेचा दाखला कोणतेही शुल्क / फी न घेता नि:शुल्क उपलब्ध करुन देणेबाबत संदर्भ क्र ४ चे मंजूर ठरावाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश निर्गत करणेत येत आहेत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मालमत्ताधारकांनी,त्यांचे मालमत्ताकराचा संपूर्ण भरणा केलेनंतर महानगरपालिकेचे www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर मालमत्ताकर थकबाकी नसलेचा दाखला फी चे धोरणात सुधारणा करुन दिनांक ११/१०/२०२२ पासून नागरिकांना थकबाकी नसलेचा दाखला कोणतेही शुल्क / फी न घेता नि:शुल्क उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थापना ११/१०/८२ पिंपरी पुणे-४११०१८

(शेखर सिंह)
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

प्रति – सर्व करसंकलन विभागीय कार्यालय

प्रत - १. सर्व विभाग

२. माहिती व जनसंपर्क विभाग – सदर आदेशास व्यापक प्रसिद्धी देणेत यावी.

३. माहिती व तंत्रज्ञान विभाग / TECH – 9

२/- परिपत्रकामध्ये नमूद केलेनुसार संगणक आज्ञावलीमध्ये योग्य ते बदल करावेत.